Please Consider the Environment Before Printing…

Date: 31/07/2025

## Activity Name: Day Special

## दिन विशेष

**News Paper Name: आपलं महानगर**

**Page No. 04**

आपल्या वाटच्या, आतल्या वाटच्या...
आपलं महानगर My महानगर.com
www.mymahanagar.com

# दिनविशेष

## संत साहित्याचे अभ्यासक लक्ष्मण पांगारकर



लक्ष्मण रामचंद्र पांगारकर हे प्राचीन मराठी वाङ्मयाचे इतिहासकार, मराठी संतचरित्रकार, हरिभक्तपरायण भागवतधर्मप्रचारक आणि रसाळ वक्ते होते. त्यांचा जन्म ३१ जुलै १८७२ रोजी चिपळूण येथे झाला. त्यांच्या घराण्याचे मूळ गाव पांगरी (ता. बार्शी जिल्हा सोलापूर) होते. पांगारकरांचे प्राथमिक शिक्षण पौड येथे, माध्यमिक शिक्षण पुण्याच्या 'न्यू इंग्लिश स्कूल' मध्ये आणि उच्च शिक्षण मुख्यत: पुण्याच्या फर्ग्युसन महाविद्यालयात झाले. १८९९ मध्ये ते बी. ए. झाले. त्यानंतर पंढरपूर, पुणे, अमरावती येथे ते शिक्षक म्हणून होते. हा व्यवसाय सोडून १९०७ मध्ये 'भक्तिज्ञानवैराग्यविवर्धक विचारांच्या लहरी स्वधर्मबांधवात वाढीस लावाव्या' ह्या हेतूने मुमुक्षु नावाचे साप्ताहिक त्यांनी धुळे येथे काढले.

पांगारकर यांना प्राचीन मराठी काव्याची गोडी होती. त्यांचे पाठांतरही उत्तम होते. त्यांनी संकलित केलेली स्तोत्रे, भूपाळ्या, आरत्या, अभंग व पदे भक्तिमार्गप्रदीप या नावाने प्रसिद्ध झालेली आहेत (१९०४). मोरोपंत हे त्यांचे एक अत्यंत आवडते कवी. त्यांची निवडक कविताही-मोरोपंती वेचे (१९०५)- पांगारकरांनी प्रसिद्ध केलेली आहे. 'मराठी भाषेचे स्वरूप' हे पांगारकरांनी लिहिलेले पहिले पुस्तक. त्यात प्राचीन मराठी साहित्याचे थोडक्यात समीक्षण केलेले आहे.

पांगारकरांचा पहिला मोठा ग्रंथ म्हणजे मोरोपंत-चरित्र आणि काव्यविवेचन (१९०८) हा होय. पुढे त्यांनी अनेक विषयांवर संशोधन व लेखन करून ग्रंथनिर्मिती केली. एकनाथी भागवत (१९१०) हा सार्थ व सटीप संपादित ग्रंथ, श्रीएकनाथ महाराजांचे संक्षिप्त चरित्र (१९११), श्रीज्ञानेश्वर महाराज-चरित्र व ग्रंथविवेचन (१९१२), श्रीतुकाराम चरित्र (१९२०) अशी संतचरित्रे त्यांनी लिहिली. लक्ष्मण पांगारकर यांचे १० नोव्हेंबर १९४१ रोजी निधन झाले.

Nashik Edition
Jul 31, 2025 Page No. 4
Powered by: erelego.com

S.N.D. POLYTECHNIC, BABHULGAON
CENTRAL LIBRARY
YEOLA DIST. NASHIK

LIBRARIAN
MR.U.D. MULANI
SND POLYTECHNIC
YEOLA-423401

PRINCIPAL
PROF.U.B JADHAV
SND POLYTECHNIC
YEOLA-423401